स्वातंत्र्य विमुक्तांचे

# अतिथी संपादकीय

भारतीय स्वातंत्र्याची सत्तरी या निमित्ताने परिवर्तनाच्या वाटसरूच्या भटक्या-विमुक्तांवरील अंकाचा दुसरा भाग आपल्यासमोर सादर करत आहोत. या माळेतील पहिला अंक १६ ऑगस्ट ते ३१ ऑगस्ट २०१७ या कालावधीत प्रकाशित झाला. या दुसऱ्याही अंकाचे लेख व लेखक संशोधकीय, चिकित्सक, विश्लेषणात्मक, अनुभवात्मक, तसेच काही माहितीपर आहेत. आधीच्या अंकातील मुद्यांचा अधिक विस्तार या अंकात केला गेला आहे. लेखकांची यादी व त्यांच्या लेखाचे शीर्षक अनुक्रमणिकेमध्ये आले आहेच. त्याची पुनरुक्ती नको पण त्यातील आशयाच्या निमित्ताने केलेले हे थोडेसे मुक्तचिंतन.

जग हे वेगाने बदलते आहे. हे बदल आर्थिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, धार्मिक असण्याबरोबर विज्ञान तंत्रज्ञानात्मक आहेत. हे बदल गरिबांच्या बाबत गरिबी वाढवणारे आहेत तर जातिव्यवस्थाक भांडवलशाहीच्या बाबतीत त्यांचे वरकड वाढवणारे आहे. जग जवळ येत असताना वर्गजातीलिंग प्रभुत्वाच्या परिणामस्वरूपी गरीब-श्रीमंत-स्त्री-पुरुषात अंतर वाढत आहे. अनेक नवनवे भौगोलिक प्रदेश, मानवी समूह जातिव्यवस्थाक भांडवलशाहीच्या शोषणाखाली दबले आहेत. भारतातील भटका-विमुक्त समाज भारतीय लोकसंख्येत पंधरा टक्के म्हणजे पंधरा कोटी आहे. युरोप-अमेरिका-आफ्रिका खंडातील अनेक देशांची लोकसंख्या पंधरा कोटी असत नाही. भारतातील पंधरा कोटी लोकसंख्या असलेल्या भटक्या-विमुक्तांची स्थिती विदारक असल्याचे इदाते किंवा रेणके कमिशन सारखे सरकारी अहवालच सांगतात. गेल्या सत्तर वर्षात भटक्या-विमुक्तातील ६० टक्के जनता भटकतीच राहिलेली आहे. ५० टक्के जनता दारिद्र्य रेषेखाली जीवन जगत आहे. ३० टक्के पेक्षा जास्त लोक पारंपारिक व्यवसाय करीत आहेत. तर उलटपक्षी केवळ ४ टक्के लोक सेवा क्षेत्रात आहेत. ८० टक्के लोक पितृसत्ताक जातपंचायतीची बंधने पाळतात. ७० टक्के लोक व्यसनाधीन आहेत. ९६ टक्के लोक निरक्षर आहेत. घिसाडी, जोशी, मसणजोगी, नंदीवाले, बहुरूपी, कैकाडी, पारधी, वडार, डवरी गोसावी, नाथबाबा, भामटा, कंजारभाट, वैदू यांसारख्या जमाती आजही पारंपरिक व्यवसायात आहेत. त्यांचे जिणे अमानुष झाले आहे. यासाठी शोषितानी एकजुटीने शोषकांचा प्रतिवाद

करणे आवश्यक आहे.

या भटक्या विमुक्तांच्या स्थितीचे समाजशास्त्रीय-अर्थशात्रीय अभ्यास झाले नाहीत. सरकारी आणि गैर सरकारी संस्थांनी याकडे अक्षम्य दुर्लक्ष्य केले आहे. नाही म्हणायला कालेलकर आयोग, लोकूर कमिटी, बी. पी. मंडल आयोग, इदाते आयोग आणि रेणके आयोग सरकारने नेमले. काही गैर सरकारी अभ्यासांमध्ये इकोनेट संस्थेचा अहवाल व टेक्निकली ॲडव्हायझरी ग्रुप यांचे अहवाल महत्त्वाचे आहेत. त्यांच्या शिफारशींची अंमलबजावणी केली असती तर भटक्या-विमुक्तांचे दिवस पालटले असते.

अन्न, वस्त्र, निवारा, वीज, पाणी, शिक्षण, नागरिकत्व आणि सन्मानासाठी फिरणाऱ्या या घटकाच्या विषमता निर्मुलनाचे प्रयत्न झाले नाही तर त्यांच्या असंतोषाला सामोरे जावे लागेल.

**नारायण भोसले** **विनायक लष्कर**



**प्रा. दत्तात्रेय रामचंद्र भोसले**

यांना

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची

हिंदी विषयात मे २०१७मध्ये

पीएच. डी.

ही सर्वोच्च पदवी

मिळाल्याबद्दल

हार्दिक अभिनंदन !

**समस्त भोसले परिवार,**

बामणी, ता. सांगोला, जि. सोलापूर